पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

वर्ष १ । अंक ७६ । बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ । मूल्य ३ । पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com


**सुविचार**

मिठासारखा स्वभाव ठेवा;
ना कुणी जास्त वापरू शकेल,
ना तुमच्याशिवाय राहू शकेल.






## »थोडक्यात

### जुन्नरमध्ये दहा वर्षांच्या मुलीवरील अत्याचार

**पुणे :** जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडीमध्ये साडेनऊ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी आहे. या घटनेनं मनाला अतिशय वेदना झाल्या. या प्रकरणी पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून तपासाचा आढावा घेतला. या प्रकरणाची पारदर्शक आणि सखोल चौकशी करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. संशयित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तपास वेगानं सुरू आहे. हे कृत्य अत्यंत निंदनीय आणि माणुसकीला काळीमा फासणारं आहे.

---

### हॉकी वर्ल्ड कपमध्ये भारत-पाक आमनेसामने!

**मुंबई :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हॉकी लढत कायम औत्सुक्य निर्माण करते. दहा वर्षांपासून भारताने पाकिस्तानविरुद्ध एकतर्फी वर्चस्व राखले आहे. काही वर्षांतील प्रतिस्पर्ध्यांमधील कामगिरी पाहिल्यास भारताच्या वर्चस्वाला पाकिस्तान धक्का देण्याची शक्यता धूसरच आहे. आज, बुधवारी प्रतिस्पर्ध्यांत होणाऱ्या वर्ल्ड कप लढतीत भारताने बाजी न मारल्यास ते चांगलेच धक्कादायक असेल. इंग्लंडने या स्पर्धेत पाकचा सहज पराभव केला, तर भारताने इंग्लंडविरुद्ध विजयाची संधी दवडली. भारताने वेल्सला नमवले.

# कृषी विद्यापीठाच्या कोट्यवधींच्या जमिनी अन् उत्पन्नावर डल्ला ?

## उच्च न्यायालय व राज्यपालांनी स्वतःहून दखल घ्यावी

### कार्यकारी परिषदेच्या संशयास्पद होकारावर प्रश्नचिन्ह!

प्रतिनिधी | १९ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या (PDKV) कार्यकारी परिषदेतील धक्कादायक व वादग्रस्त निर्णयांवरून विद्यापीठ वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत आहे. नागपुरातील दोन आणि अमरावतीतील एका अत्यंत मौल्यवान जागेच्या वाटपावरून, तसेच कोट्यवधी रुपयांचे भाडे माफ करण्यावरून मोठा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कार्यकारी परिषदेच्या एका सदस्याने नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर, १५०० कोटींच्या जमिनीचा केवळ ८०० कोटींत बीओटी सौदा आणि कंत्राटदारांचे भाडेमाफ करून कराराचा विस्तार करण्याचा हा प्रकार म्हणजे थेट भ्रष्टाचाराचा पुरावा आहे.

या संपूर्ण अनागोंदी कारभाराची मुंबई उच्च न्यायालयाने तातडीने 'सुओ मोटो' (स्वयंस्फूर्त) दखल घ्यावी आणि कुलपती तथा राज्यपालांनी या व्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी जोरदार मागणी जोर धरत आहे.या विषयी विद्यापीठाची भुमिका जाणून घेण्यासाठी विद्यापीठाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो झाला नाही.



ठराव क्रमांक : काप/५९/२०२६, दिनांक : १९ जुन, २०२६.

कार्यकारी परिषद, नागपूर येथील मौजा काचीपुरा जागेचा विकास करण्याकरीता म.रा.पा.सु.वि. महामंडळ मर्या., प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावानुसार विद्यापीठास रक्कम रू.८००/- कोटी (रू.आठशे कोटी) ०७ वर्षांच्या समान हप्त्यामध्ये विद्यापीठाच्या नियंत्रक यांच्या नावे असलेल्या विद्यापीठ निधी खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा करण्याच्या अटीस अधिन राहुन मंजुरी प्रदान करते. तसेच सदर प्रकल्पातुन किमान रू.८००/- कोटी खात्यामध्ये वेळोवेळी जमा करणे तसेच त्याव्यतीरीक्त जो काही नफा मिळेल त्यातील ५० टक्के वाटा विद्यापीठाच्या खात्यात जमा करणे या अटीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करते. त्याचप्रमाणे जो करार करण्यात येईल तो विद्यापीठ जमिन संरक्षण समितीचे मान्यतेने अंतिम करावा असे निर्देश देते.



### १. अडीच कोटींचे भाडे माफ अन् १० वर्षांचा छुपा विस्तार

नागपूर कृषी महाविद्यालयाच्या अत्यंत मोक्यावर असलेल्या सातपुडा वनस्पती उद्यानाचे भाडे समायोजन करताना 'मे. सत्यगीता इन्फ्रा डील्स प्रा. लि.' या खाजगी कंपनीला १ एप्रिल २०२२ ते ९ जानेवारी २०२४ या कालावधीचे संपूर्ण भाडे माफ करण्यात आले. यामुळे विद्यापीठाचे सुमारे अडीच कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. तेलंखेडी येथील २६ एकर जागेतून रोजच्या लग्न-समारंभांतून १५-२० लाख कमावणाऱ्या कंत्राटदारावर खुली निविदा न काढता ही मेहरबानी का दाखवली गेली, असा सवाल उपस्थित होत आहे. सुरुवातीला ही जमीन ३० वर्षांसाठी देण्याचा घाट घातला गेला होता, मात्र विरोधानंतर १० वर्षांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला.

### २. १५०० कोटींची काचीपुरा जमीन ८०० कोटींच्या सौद्यात?

नागपूर येथील अत्यंत मोक्याची ५० एकर मौजा काचीपुरा जमीन एमएसआरडीसीला (MSRDC) विकसित करण्यासाठी देण्याचा ठराव (१९ जून २०२६) मंजूर करण्यात आला. विद्यापीठाला ८०० कोटी रुपये ७ वर्षांत मिळतील आणि नफ्यात ५०% वाटा असेल, असा दावा केला जात आहे. परंतु, बाजारात १५०० कोटींचे मूल्य असलेल्या या जागेचा सौदा अवघ्या ८०० कोटींत कोणाच्या दबावाखाली आटोपला गेला? नफ्याचा ५०% वाटा नक्की कसा ठरवला, याबाबत पारदर्शकतेचा पूर्ण अभाव आहे.

### ३. अमरावतीत नियम डावलून ७ हेक्टरची घाई

अमरावतीतील तपोवन रोडवरील कृषी संकुल परिसरातील ७ हेक्टर (७९,१२८ चौ.मी.) जमीन वर्ग करण्याचा प्रस्ताव विहित मार्गाने मुख्य प्रादेशिक संशोधन संचालकांकडून आलेला नव्हता. ऐनवेळी 'वेळेवरच्या विषयात' हा विषय आणून जमीन लाटण्याचा प्रयत्न झाला, ज्याला अखेर स्थगिती देऊन शासकीय मोजणीचे निर्देश द्यावे लागले.

### प्रामाणिक अधिकाऱ्यांची उचलबांगडी, 'कद्दू' झाले गोड!

तत्कालीन कुलगुरू डॉ. दाणी यांनी विद्यापीठाची एक इंच जमीन व्यापाऱ्यांना न देण्याची ठाम भूमिका घेतली होती. मात्र, त्यानंतर स्वतःच्या बचावासाठी काही वरिष्ठांनी राजकीय वरदहस्त असलेल्यांना या जमिनी दान केल्याचा आरोप आहे. तेलंखेडीचे थकीत भाडे वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याची मुल (जि. चंद्रपूर) येथे बदली केली गेली, तर ३० वरिष्ठांना डावलून सहयोगी प्राध्यापक कद्दू यांच्यावर मेहरबानी दाखवण्यात आली. कद्दू आणि तत्कालीन डीन पंचभाई यांच्या लाभाच्या पदांची चौकशी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र दोन गोष्टींमुळे जगाच्या नकाशावर!

प्रतिनिधी | १९ ऑगस्ट

**मुंबई :** आजघडीला महाराष्ट्र हा दोन गोष्टींमुळे जगाच्या नकाशावर आहे. एक गोष्ट म्हणजे मुंबई आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुमच्या राज्याचे अद्वितीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अशा शब्दांत अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले.

मुंबईतील 'मेडिसिटी'साठी अमेरिकेच्या क्लिव्हलँड क्लिनिकसोबत महाराष्ट्र शासनाचा करार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांच्या उपस्थितीत हा सामंजस्य करार झाला. यावेळी उभयतांमध्ये अमेरिका-भारत द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासंदर्भात चर्चा झाली. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावरुन अमेरिकेन राजदूत सर्जिओ गोर देवेंद्र फडणवीस यांचे केलेले कौतुक सध्या सोशल मिडिया आणि राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. एखादा अनिवासी भारतीय, अमेरिकन उद्योजक किंवा नेत्याने हे कौतुक केलेले नाही. तर भारतात अमेरिकेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजदूत पदावरील व्यक्तीने एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे कौतुक करणे ही बाब उल्लेखनीय मानली जात आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या चांगल्या कामगिरीच दखल फक्त महाराष्ट्र आणि भारतात नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील घेतली जात असल्याचे यानिमित्ताने दिसून येत आहे.

या कार्यक्रमात सर्जिओ गोर यांनी आपल्या भाषणात म्हटले की, मला ज्यांना पाहून आनंद होत आहे, ते माझे मित्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. मला एक गोष्ट सांगायची आहे, मी जगभर फिरलो आहे, अनेक नेत्यांना भेटलो आहे. तुमच्याकडे एक असा माणूस आहे, जो डायनॅमिक आहे, प्रचंड ऊर्जा असलेला आहे आणि ज्याला आपल्या कामाबद्दल आस्था आहे. आजघडीला महाराष्ट्र दोन कारणांमुळे जगाच्या नकाशावर आहे. एक म्हणजे मुंबई दुसरं म्हणजे तुमचे विलक्षण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. त्यांच्यासाठी जोरदार टाळ्या वाजवा, असे सर्जिओ गोर यांनी म्हटले.

**अमेरिकेन राजदूत :मुंबई आणि फडणवीसांचे कौतुक**



### राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष देवेंद्र फडणवीसांकडे!

गेल्या काही दिवसांपासून देवेंद्र फडणवीस यांचे नाव राष्ट्रीय पातळीवर प्रचंड चर्चेत आहे. अलीकडेच त्यांनी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे लवकरच दिल्लीत केंद्र सरकारमध्ये महत्त्वाच्या पदावर जातील, असा दावा केला होता. या सगळ्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष सध्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लागले आहे.

# कचरा संकलन समस्येवर मोठा निर्णय

## 'डोअर टू डोअर' कचरा संकलनास मान्यता

प्रतिनिधी | १९ ऑगस्ट

**अकोला:** अकोला शहराच्या स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून, अकोला महानगरपालिकेने 'डोअर टू डोअर' (घरपोच) कचरा संकलन व वाहतुकीचा प्रस्ताव अधिकृतपणे स्थायी समितीत मंजूर केला आहे. या निर्णयामुळे शहराची कचऱ्याची समस्या दूर होण्यास मोठी मदत होणार आहे. निविदा व दर वाटाघाटी प्रक्रियेनंतर नागपूरच्या मे. अर्बन इन्व्हार्यो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड या कंपनीची प्रति मेट्रिक टन रुपये ४,८०२ दराने कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही कंपनी शहरात ए टू



झेड स्वरूपात काम करणार असून, घरोघर जाऊन कचरा गोळा करणे आणि तो निश्चित केलेल्या संकलन केंद्रापर्यंत पोहोचवण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे. त्यामुळे इतर छोट्या कंपन्यांचे काम आता थांबणार आहे.

स्थायी समितीच्या सभेत हा प्रस्ताव मंजूर झाला असून, आगामी १५ दिवसांच्या आत अकोला शहरात प्रत्यक्ष कचरा संकलनाचे काम सुरू होईल. असा दावा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी केल आहे. या महत्त्वपूर्ण करारामुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक गतिमान होऊन नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> 'अकोला शहरामध्ये डोअर-टू-डोअर कचरा संकलन करणं, ए टू झेड काम त्याच्याकडे राहणार आहे. कचरा संकलन केंद्रापासून... घरोघरून कचरा जमा करणं आणि संकलन केंद्रापर्यंत नेण्यापर्यंत काम कंत्राटदाराकडे राहणार आहे. स्थायी समितीत तो ठराव मंजूर झाला. येत्या १५ दिवसांमध्ये अकोला शहरामध्ये कचऱ्याचं काम सुरू होऊन जाईल आणि कचऱ्याच्या समस्येपासून अकोला शहराला निराकरण होऊन जाईल.
>
> **-विजय अग्रवाल,** सभापती स्थायी समिती,मनपा, अकोला

# अमरावतीतील महर्षि स्कूलमधील मेळघाटच्या आदिवासी विद्यार्थ्याचा मृत्यू

## 5 विद्यार्थी गंभीर, चौकशी सुरू

प्रतिनिधी | १९ ऑगस्ट

**अमरावती :** अमरावतीतून एक अत्यंत धक्कादायक आणि दु:खद बातमी समोर येत आहे. अमरावतीमधील महर्षी पब्लिक स्कूल या निवासी शाळेत शिकणाऱ्या मेळघाटातील एका आदिवासी विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अन्य ५ विद्यार्थी गंभीर अवस्थेत खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

चिखलदरा तालुक्यातील कारंजखेडा येथील इयत्ता ११ वीचा विद्यार्थी राजेश बाबू बेठेकर याला त्रास होऊ लागल्याने हतरू येथील प्राथमिक आरोग्य





उपकेंद्रात दाखल करण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. तर दुसरीकडे, रविदास बेठेकर (१५), विशाल बेठेकर (१७), राम धांडे (१७), सतीश बेठेकर (२०) आणि रोहन जांभेकर (१५) या पाच विद्यार्थ्यांना अमरावतीतील कुसुमांजली हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले आहे. जेवण केल्यानंतर आपल्याला त्रास व्हायला लागला, असे आदिवासी विद्यार्थी सांगतात. दरम्यान १५ ऑगस्टला जेवण केल्यानंतर या विद्यार्थ्यांना त्रास होत होता. त्यामुळे त्याने घरी फोन करून त्याच्या भावाला बोलावले होते. त्याचा भाऊ त्याला आश्रम शाळेतून घेऊन गेला होता दरम्यान या आश्रम शाळेची संपूर्ण चौकशी करून आश्रम शाळेची परवानगी रद्द करत असल्याची माहिती आदिवासी अप्पर आयुक्त संदीप गोलाईत यांनी दिली.

> गेल्या १६ तारखेपासून या विद्यार्थ्यांना तीव्र डोकेदुखी, ताप, उलट्या, जुलाब आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाला होता. हा प्रकार अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे घडला की डायरियाच्या संसर्गामुळे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या दुर्दैवी घटनेची आणि विद्यार्थ्यांच्या अचानक बिघडलेल्या प्रकृतीची आदिवासी विकास विभागाकडून प्रशासकीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.
>
> **-संदीप गोलाईत,** आदिवासी अप्पर आयुक्त अमरावती

# खामगाव ते शेगाव पालखीसोबत लाख भक्त !

प्रतिनिधी | १९ ऑगस्ट

**खामगाव :** आषाढी एकादशीचा सोहळा आटोपून परतीच्या प्रवास दरम्यान श्रींच्या पालखीचा अखेरचा मुक्काम खामगाव येथे मंगळवारी झाल्यानंतर आज बुधवारी पहाटे ही पालखी संत नगरीसाठी रवाना झाली. या पालखी सोबत पायी वारी करण्याकरिता गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा प्रचंड गर्दी दिसून आली. लाखो भाविकांची पालखी मार्गावर गर्दी झाल्याने अनेक तास या अध्यात्मिक यात्रेत पाय ठेवायलाही जागा नव्हती. अशी स्थिती होती.

पंढरपूर येथील आषाढी एकादशीसाठी दरवर्षी संत गजानन महाराजांची पालखी जाते. हा सोहळा आटोपल्यानंतर या पालखीचा



परतीचा प्रवास सुरु होतो. यावेळी जिल्ह्यात या पालखीचे आगमन आगस्ट शेवटच्या आठवड्यात झाले होते. 18 आगस्ट मंगळवार रोजी ही मुक्कामासाठी खामगावात दाखल झाली होती. 19 आगस्ट रोजी शेगावसाठी सदर पालखी रवाना झाली. या पालखीसोबत जिल्हा भरातील भाविक मोठ्या प्रमाणात शेगावपर्यंत पायी वारी करतात. त्यामुळे जिल्हाभरातून अनेक भाविक 18 आगस्ट रोजी खामगावात दाखल झाले होते. तर अनेक भाविक विविध वाहनांव्दारे बुधवारी पहाटेच शहरात आले होते. त्यानंतर या पालखीसोबत मोठ्या प्रमाणात पायी वारीसाठी भाविक शेगाव पर्यंत सहभागी झाले होते. यावेळी पाऊस नसल्यामुळे भाविकांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात होती. पोलिसांनी या पालखीतील भाविकांचा अंदाज 2 लाखा च्या आस पास लावला आहे.

### अन् शहरातील शाळा ओस पडल्यात

आध्यात्माकडे तरुण-तरुणायीचा अलिकडच्या काळापासून मोठा कल दिसून येत आहे. त्यामुळे या पायी वारीसाठी तरुण-तरुणींची संख्या लक्षवेधी होती. त्यातच अनेक शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी तरुण सहभागी झाले होते. परिणामी शहरासह तालुक्यातील अनेक महाविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती नगन्य होती. त्यामुळे शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या रोडावलेली दिसून आली

# मालेगावच्या मोर्णा तलावात प्रेमीयुगलाचे मृतदेह आढळले

## लग्नाला विरोध असल्याने उचलले टोकाचे पाऊल !

प्रतिनिधी | १९ ऑगस्ट

**वाशिम :** मालेगाव तालुक्यातील मोर्णा तलावात युवक आणि युवतीचे मृतदेह काल आढळून आले आहे. याप्रकरणी आता नवीन माहिती समोर आली असून घरच्यांचा लग्नाला विरोध असल्यामुळं दोघांनीही तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मालेगाव तालुक्यातल्या गोकसावंगी गावातील 24 वर्षीय युवक महादेव गजानन निंबाळकर आणि 21 वर्षीय निकिता संतोष कांबळे ही युवती 14 ऑगस्ट पासून बेपत्ता



झाले होते .याप्रकरणी त्यांच्या पालकांनी मालेगाव पोलीस स्टेशनमध्ये हरवल्याची तक्रारही दिली होती.

मात्र काल या दोघांचेही मृतदेह गावाजवळच असलेल्या मोर्णा तलावात आढळून आले .पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या दोघांचे प्रेम संबंध होते आणि लग्न करण्यासंदर्भात त्यांनी घरच्यांना माहिती दिली होती. मात्र दोघेही वेगवेगळ्या जातीतील असल्यानं त्यांच्या घरच्यांचा या आंतरजातीय विवाहाला विरोध होता. घरच्यांना अनेक वेळा समजून सांगूनही ते लग्नाला तयार होत नसल्यानं नैराशेत गेलेल्या दोघांनीही आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला आणि तलावात उडी घेतली. काल मासेमारी करण्यासाठी काही जण गेले असतांना त्यांना दोन्ही मृतदेह एकाच ठिकाणी आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही मृतदेह तलावच्या बाहेर काढून शव विच्छेदणासाठी पाठवलेत आणि पुढील तपास सुरु केला आहे. मात्र समाजातील खोट्या प्रतिष्ठेच्या भीतीनं दोघांनी आपला जीव गमावला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## महागावचे शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**महागाव कसबा :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेपासून वंचित राहिलेल्या महागाव कसबा (ता. दारव्हा) येथील शेतकऱ्यांना लाभ मिळावा, अशी मागणी ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेत करण्यात आली. येथील ६८ शेतकरी अद्याप या योजनेच्या लाभापासून वंचित आहे.

वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या लाभाकरिता ठराव घेण्यात आला. ठरावाची प्रत आणि वंचित शेतकऱ्यांची यादी पालकमंत्री संजय राठोड, आमदार बाळासाहेब मांगुळकर, जिल्हा बँक, जिल्हा उपनिबंधक आदींना देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष धर्मेंद्र दुधे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेला महादेवराव दुधे, खलील खा पठाण, धर्मराज चव्हाण, शंकर राऊत, मारोती बेले, उत्तम ढाकुलकर, रामकृष्ण बोर चाटे, परसराम पवणे, देविदास कांबळे, वसंता ढोके, शोभाबाई भेंडे आणि सचिव बाळू चव्हाण आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# ‘शेतकरी स्वावलंबी करीत वसंतराव नाईकांनी घडविली हरित क्रांती’

### राहुल नार्वेकर यांचे प्रतिपादन; कृषी क्षेत्रात ‘एआय’चा वापर वाढविण्याचे आवाहन

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**यवतमाळ :** शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवून महाराष्ट्रात हरित क्रांतीची पायाभरणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे कृषी शिक्षण, संशोधन आणि आधुनिक शेतीला चालना मिळाली, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केले.

वसंतराव नाईक यांच्या ४७व्या स्मृतिदिनानिमित्त पुसद येथील बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सुधाकर नाईक प्रेक्षागृहात वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित कृषी गौरव पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. नार्वेकर यांच्या हस्ते राज्यातील प्रगतिशील शेतकरी, कृषी शास्त्रज्ञ आणि कृषी संस्थांना ‘वसंतराव नाईक कृषी गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आले.

“एकेकाळी देशाला अन्नधान्यासाठी परदेशाकडे पाहावे लागत होते. आज भारत अन्नधान्याची निर्यात करणारा देश झाला आहे. या परिवर्तनात शेतकऱ्यांचा वाटा मोठा आहे. त्यामुळे बळीराजाच्या कर्तृत्वाचा गौरव करणारे असे उपक्रम महत्त्वाचे आहेत,” असे नार्वेकर म्हणाले.

शेतीत ‘एआय’चा प्रभावी वापर हवा

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्याची गरज असल्याचे नार्वेकर यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेती अधिक ज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम होऊ शकते. विकसित भारताचे स्वप्न साकारताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक असून, संशोधन व नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून कृषी विकासाला गती देण्याचे आवाहन त्यांनी केले.

**नऊ शेतकरी, दोन कृषी तज्ज्ञांचा गौरव**

■ डाळिंब, द्राक्ष, केळी, आंबा-काजू, संत्री, ऊस, हळद, सोयाबीन, कापूस आदी क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या संतोष पऱ्हाळे, अवंतिका सुकटकर, संगीता सांगळे, शशांक पाटील, सुशांत नाईक, यशोदा कातबने, माऊली जाधव, गोपाल भकते आणि अशोक वानखेडे या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे प्रमुख शास्त्रज्ञ अशोक कडलग आणि ऊस संशोधक डॉ. बाळकृष्ण जमदग्नी यांनाही पुरस्कार देण्यात आला.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याचा गौरव करताना चार कृषी विद्यापीठांची निर्मिती, महाबीज, रोजगार हमी योजना आणि अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णतेसाठी त्यांनी दिलेले योगदान अधोरेखित केले.




राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांनी पुरस्कारार्थी शेतकऱ्यांच्या प्रयोगांचा इतर शेतकऱ्यांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी नाईक परिवाराच्या लोकसेवेच्या परंपरेचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, कुलगुरू डॉ. शरद गडाख, आमदार किसन वानखेडे, माजी आमदार निलय नाईक, नगराध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक, जिल्हाधिकारी विकास मीना, पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्यासह शेतकरी, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

## चारचाकी-दुचाकी अपघात; तरुणीचा मृत्यू

### अंतरावर येथील घटना : चारचाकी-दुचाकी; दुचाकीचालक गंभीर

प्रतिनिधी १९ ऑगस्ट





**बाभुळगाव :** यवतमाळ-धामणगाव महामार्गावर जुन्या अंतरगावजवळ चारचाकी आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन दुचाकीवरील तरुणीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर दुचाकीचालक गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी (ता. १८) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली.

अनुष्का दिलीपराव येरमे (वय २१, रा. अंतरगाव (चिखली), ता. राळेगाव) असे मृत तरुणीचे नाव आहे. तर आर्यन धुर्वे (वय २८, रा. यवतमाळ) हा जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन धुर्वे आणि अनुष्का येरमे हे दुचाकीने यवतमाळकडून येत होते. दरम्यान, देवगावकडून येणाऱ्या इको चारचाकीने त्यांच्या दुचाकीला समोरून धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला फेकली गेली.

अपघातात अनुष्का यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने बाभुळगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आर्यन धुर्वे याच्यावर प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेने घटनास्थळी धाव घेतली. वृत्त लिहिपर्यंत अपघातप्रकरणी गुन्हा दाखल झालेला नव्हता.

## भूमिपूजनाच्या निमंत्रणावरून ‘इंगळे’ समर्थक आक्रमक

### उमरखेडमध्ये भाजपातील अंतर्गत धुसफूस उफाळली : आमदारांच्या निवासस्थानी आदिवासी समाजाचा घेराव

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**उमरखेड :** केंद्रीय निधी मार्ग योजना २०२५-२६ अंतर्गत हरदडा-ब्राह्मणगाव-चातारी-कारखेड या सुमारे ६२ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या भूमिपूजन सोहळ्याला भाजपचे माजी आमदार उत्तमराव इंगळे यांना निमंत्रण न दिल्याने उमरखेड तालुक्यातील राजकीय वातावरण तापले आहे. माजी आमदारांना जाणीवपूर्वक डावलल्याचा आरोप करीत आदिवासी समाजातील नागरिक आणि इंगळे समर्थकांनी रविवारी (दि. १६) आमदार किसनराव वानखेडे यांच्या निवासस्थानी धडक देत जाब विचारला.

भूमिपूजन सोहळ्याला उद्घाटक म्हणून आमदार किसनराव वानखेडे उपस्थित होते. यावेळी भाजपचे

**‘यापुढे अपमान सहन करणार नाही’**

■ बापूसाहेब चिरंगे, शिवहर दुमारे, संभाजी मुरमुरे, साहेबराव इंगळे, किशनसिंह शेखावत यांच्यासह समर्थकांनी आमदार वानखेडे यांची भेट घेऊन माजी आमदार इंगळे यांच्याबाबत सन्मानाची भूमिका ठेवण्याची मागणी केली. पक्षातील एकाधिकारशाहीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचा आरोपही त्यांनी केला. यापुढे अपमानास्पद वागणूक सहन केली जाणार नाही, असा इशारा देण्यात आला.

जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी आमदार नामदेव ससाणे, प्रकाश पाटील देवसरकर, विजय खडसे यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे नेते साहेबराव कांबळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊसाहेब माने, जिनिंग अँड प्रेसिंग सोसायटीचे अध्यक्ष शिवाजी माने आदी उपस्थित होते.

मात्र उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा आमदार राहिलेल्या उत्तमराव इंगळे यांचा कार्यक्रमात समावेश नसल्याने समर्थकांमध्ये नाराजी निर्माण झाली.

इंगळे यांनी मतदारसंघात भाजपची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी योगदान दिले असून, त्यांना राजकीय कार्यक्रमांपासून वारंवार दूर ठेवले जात असल्याचा आरोप समर्थकांनी केला. या प्रकारामुळे आदिवासी समाजातही संतापाची भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

**राजकीय कार्यक्रमांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न**

■ दरम्यान, माजी आमदार उत्तमराव इंगळे यांनीही काही नेते आपल्याला जाणीवपूर्वक राजकीय कार्यक्रमांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला. आपण दोन वेळा बहुमताने निवडून आलो असून पक्षवाढीसाठी सातत्याने काम केले. असे असताना डावलले जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## जनतेचा विश्वास हीच पोलिसांच्या कार्याची पावती : विकास दांडे

### वडगाव जंगल ठाणेदारांचा सत्कार; शिवबा मंचतर्फे गौरव

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**कळंब :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वडगाव जंगल पोलीस ठाण्याचे ठाणेदार विकास दांडे यांचा उल्लेखनीय कार्याबद्दल मेटीखेडा येथील ग्रामपंचायत कार्यालयात उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. शिवबा मंचचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते वैराज कदम यांच्या वतीने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

ठाणेदार दांडे यांनी गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवून कर्तव्य बजावले आहे. त्यांच्या तत्पर कार्यपद्धतीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये पोलिस प्रशासनाबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असल्याने त्यांच्या कार्याची परिसरात दखल घेतली जात आहे.

यावेळी वैराज कदम यांनी ठाणेदार दांडे यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती भेट देऊन सत्कार केला.




**‘कायद्याच्या चौकटीत योग्य कारवाई करणे हेच कर्तव्य’ :** सत्काराला उत्तर देताना विकास दांडे म्हणाले, “कोणत्याही एका व्यक्तीच्या बाजूने न जाता कायद्याच्या चौकटीत दोन्ही बाजू ऐकून योग्य ती कारवाई करणे हे आमचे कर्तव्य आहे. अनेकदा दोन्ही पक्षांकडून तक्रारी दाखल होतात. अशावेळी वस्तुस्थिती जाणून घेऊन कायद्यानुसार कार्यवाही केली जाते. आम्ही २४ तास जनतेच्या सेवेसाठी तत्पर आहोत. नागरिकांचे प्रेम, विश्वास आणि सहकार्य हेच कार्यासाठी बळ देणारे आहे.”

या सत्कार सोहळ्यास ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवरांची उपस्थिती होती.

## आर्णीत ३० जणांचे रक्तदान, २५ जणांची ऐच्छिक नावनोंदणी



प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**आर्णी :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास आर्णीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक एकता, मानवता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर भविष्यात गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्यासाठी २५ जणांनी ऐच्छिक रक्तदानासाठी नावनोंदणी केली.

शिबिराची सुरुवात महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी शासकीय व पोलिस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. आर्णीतील इरफान शेख मुस्तफा यांनी पत्नीसह रक्तदान करून सामाजिक एकतेचा प्रेरणादायी संदेश दिला. नगरसेविका भावना जयराज मुनेश्वर यांच्यासह तीन महिलांनीही रक्तदान केले. अनेकांनी प्रथमच रक्तदान करत सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.

शिबिराला सामाजिक संघटना, पत्रकार संघटना, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व शासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रशिक मुनेश्वर, इरफान रजा, शाहरुख सुभान खान, अनिस शेख, इरफान शेख यांनी परिश्रम घेतले.

## फार्मसी शिक्षणातील आधुनिक अध्यापनासाठी राज्यस्तरीय शिक्षक प्रशिक्षण

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**पुसद :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सुधाकरराव नाईक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE), मुंबई यांच्या प्रायोजित पाचदिवसीय राज्यस्तरीय शिक्षक विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते मंगळवारी (ता. १८) झाले.

१८ ते २२ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या प्रशिक्षणाचा उद्देश फार्मसी क्षेत्रातील आधुनिक अध्यापन पद्धती, संशोधन तसेच नवीन तंत्रज्ञानाबाबत प्राध्यापकांना अद्ययावत माहिती देणे हा आहे. राज्यातील १६ नामांकित संस्थांमधून ३५ प्राध्यापक या प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत.

उद्घाटनप्रसंगी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी उपस्थित प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत ठेवत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.




कार्यक्रमास जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्ष पूजाताई जयभाऊ नाईक, संचालक गजेंद्रसिंह गौतम, तंत्रशिक्षण सहसंचालक कार्यालय नागपूर येथील मुख्य सचिव कांचन मानकर, सहसचिव दिलीप लिल्हारे आदी उपस्थित होते. संस्थेचे प्राचार्य डॉ. पी. एस. कवटिकवार, प्राचार्य डॉ. आर. एस. वानरे आणि विभागप्रमुख डॉ. आर. बी. वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. पारस बी. पोफाळकर हे कार्यक्रमाचे समन्वयक आहेत. पाच दिवसांच्या प्रशिक्षणात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून आधुनिक फार्मसी शिक्षण, अध्यापन तंत्र आणि संशोधनाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या उपक्रमामुळे प्राध्यापकांच्या शैक्षणिक व संशोधनात्मक कौशल्यात भर पडेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## ‘नगरपरिषदेला लुटणाऱ्यांनी आम्हाला पारदर्शकता शिकवू नये’

### विरोधकांचे आरोप राजकीय वैफल्यातून; सत्ताधारी जनशक्ती आघाडीचा पलटवार

प्रतिनिधी १९ ऑगस्ट



**उमरखेड :** नगरपरिषदेच्या कारभारावर विरोधकांकडून करण्यात येणारे आरोप राजकीय वैफल्यातून आणि जनतेची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने होत असल्याचा आरोप नगरपरिषदेचे शिक्षण सभापती रसूल पटेल यांनी केला.

‘नगरपरिषदेला लुटणाऱ्यांनी आम्हाला पारदर्शकतेचा धडा शिकवू नये,’ असा टोला त्यांनी लगावला. १८ ऑगस्ट रोजी जुन्या काँग्रेस कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी उपाध्यक्ष जुबेर कुरेशी, बांधकाम सभापती वीरेंद्र खंदारे, महिला व बालकल्याण सभापती फरजाना सय्यद रहीम, नगरसेवक गजानन रासकर, गणेश खंदारे आदी उपस्थित होते.

नगरपरिषदेतील शिक्षक भरतीवरून विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपाला उत्तर देताना पटेल यांनी, शहरातील नगरपरिषद शाळांमधील ४,१२७ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कंत्राटी व मानधन तत्त्वावर शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. २०१७-१८ व २०१८-१९ मध्येही अशाच पद्धतीने भरती झाल्याचा दावा त्यांनी केला. २०२६-२७ साठी सर्वसाधारण सभेचा ठराव आणि अर्थसंकल्पीय तरतूद असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विरोधी पक्षनेते विजय हरडफकर यांनी १२ ऑगस्टला शिक्षक भरतीची मागणी करून चार दिवसांतच त्याला विरोध केल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांनी केला.

शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, नालेसफाई आणि रस्त्यांची कामे नियमानुसार सुरू असल्याचा दावा करण्यात आला. सुमारे ५० कोटी रुपयांची विकासकामे सुरू असल्याचेही पटेल यांनी सांगितले. विरोधकांनी केलेल्या आरोपांबाबत पुरावे सादर करून संबंधितांविरुद्ध न्यायालयीन दाद मागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## ‘दारूबंदी’साठी महिलांचा एल्गार!

### तिधरीपोडातील अवैध दारू विक्री; कळंब पोलिसांना निवेदन

प्रतिनिधी १९ ऑगस्ट




**कळंब :** स्वातंत्र्यदिनी देशभर स्वातंत्र्याचा उत्सव साजरा होत असताना कळंब तालुक्यातील तिधरीपोडातील महिलांनी आपल्या वस्तीला अवैध दारूच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी थेट पोलिस ठाणे गाठले.

डोंगरखर्डा येथील तिधरीपोडावर अवैध दारूची विक्री सुरू असून, त्यामुळे वस्तीतील भांडणे आणि कौटुंबिक कलह वाढत असल्याचा आरोप करीत महिलांनी कळंब पोलिस ठाण्यात निवेदन दिले.

तिधरीपोडावर सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे अनेक कुटुंबांमध्ये सातत्याने वाद निर्माण होत आहेत. दारूच्या व्यसनामुळे काहींचे संसार उद्ध्वस्त होत असून, त्याचा परिणाम कुटुंबातील महिला आणि मुलांवर होत असल्याचे महिलांनी निवेदनात नमूद केले. विशेषतः अल्पवयीन मुलांवर व्यसनाचे दुष्परिणाम होऊन त्यांच्या भवितव्यावर परिणाम होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

वस्तीतील अवैध दारू विक्री तातडीने बंद करावी आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महिलांनी केली. स्वातंत्र्यदिनीच मोठ्या धैर्याने पोलिस ठाण्यात धडक देत महिलांनी आपल्या समस्या मांडल्याने त्यांच्या या भूमिकेची परिसरात चर्चा होत आहे.

**‘दारूमुळे संसार उद्ध्वस्त होऊ नयेत’**

■ अवैध दारू विक्रीमुळे वस्तीतील शांतता भंग होत असून, कुटुंबांमध्ये वाद वाढत आहेत. मुलांचे भवितव्य सुरक्षित राहावे. तसेच वस्तीतील वातावरण निरोगी राहावे, यासाठी दारू विक्री कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी महिलांनी केली आहे.

महिलांनी दिलेल्या निवेदनाची पोलिसांनी दखल घेतली असून, उपस्थित अधिकारी काळे यांनी अवैध दारू विक्रीविरोधात तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे पोलिसांच्या पुढील कारवाईकडे तिधरीपोडातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# रस्त्यावर गिट्टीचा खच; ओव्हरलोड वाहनांना कुणाचा आशीर्वाद ?

## नागरिकांच्या जिवाशी चाललेला खेळ थांबवा

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**अकोट :** क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक भार घेऊन धावणाऱ्या गिट्टी-मुरूम वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावरच गिट्टीचा खच पडत असल्याचे चित्र नेहमीच दिसते. ओव्हरलोड वाहनांची ही बेफाम वाहतूक नागरिकांच्या जिवावर बेतण्याची प्रशासन वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

गिट्टी वाहून नेणाऱ्या वाहनांमधून रस्त्यावर खडी सांडत असल्याने दुचाकीस्वारांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. अचानक चाकाखाली आलेली गिट्टी घसरून अपघात होण्याची शक्यता असताना संबंधित यंत्रणेचे याकडे दुर्लक्ष का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**RTO आणि गौण खनिज विभाग नेमका करतोय तरी काय?**

ओव्हरलोड वाहनांवर कारवाई करणे ही RTO विभागाची जबाबदारी असताना, गिट्टी-मुरूम यांसारख्या गौण खनिजाच्या वाहतुकीची वैधता, रॉयल्टी व परवानगी तपासण्याची जबाबदारी संबंधित गौण खनिज विभागाची आहे. मग प्रत्यक्ष रस्त्यावर सुरू असलेल्या या वाहतुकीवर संयुक्त कारवाई का दिसत नाही?



शहरातील चौकाचौकात CCTV कॅमेरे असतानाही ओव्हरलोड वाहनांची वाहतूक प्रशासनाच्या नजरेत येत नाही का? CCTV असूनही कारवाई नाही की कारवाई करण्याची इच्छा नाही? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

**रस्त्यावर पसरलेली गिट्टी धोकादायक**

रस्त्यावर पसरलेली गिट्टी वाहन चालकांसाठी धोकादायक ठरत आहे. तरीही संबंधित प्रशासन लक्ष देत नाही. लोकांकडून ओरड होते तरी देखील दखल घेतली जात नाही हे दुर्दैव आहे. शहरातील गैरप्रकार वेळीच थांबणे आवश्यक आहे.

आज रस्त्यावर गिट्टी सांडतेय; उद्या अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? RTO आणि गौण खनिज विभागाने संयुक्त मोहीम राबवून ओव्हरलोड तसेच नियमबाह्य गौण खनिज वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# हिवरखेडच्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कमतरता

## 8 दिवसांत शिक्षक भरती न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथील महात्मा गांधी जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. ९५ विद्यार्थ्यांसाठी अवघे २ शिक्षक असल्याने संतप्त नागरिकांनी जिल्हा परिषदेला निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला.

एकेकाळी ३५० विद्यार्थी संख्या असलेल्या हिवरखेडच्या महात्मा गांधी जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या आता अवघ्या ९५ वर आली आहे. या ९५ विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शाळेत सध्या केवळ २ शिक्षक कार्यरत आहेत.



शासकीय शाळा बंद करून खासगी शाळांना प्रोत्साहन देण्याचे हे षड्यंत्र असल्याचा गंभीर आरोप माजी विद्यार्थ्यांनी केला आहे.

सैनिक आणि गोरगरीब नागरिकांच्या मुलांचे भवितव्य धोक्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. गट शिक्षण अधिकाऱ्यांनी येत्या ८ दिवसात या शाळेवर ५ ते ६ अधिकृत शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आमरण उपोषण आणि तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

# पुरातन खोलेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**बार्शीटाकळी :** पहिल्या श्रावण सोमवारी बार्शीटाकळी येथे कावडीने खोलेश्वराला जलाभिषेक करण्यात आला. शिवाचे पुरातन खोलेश्वर मंदिर आहे. महादेवाच्या दर्शना करीता दुरून दुरून भाविक येतात. हे मंदिर शंभर वर्ष जुने असून श्रावण महिन्यात मंदिर परिसरात यात्रा भरते. आज भाविकांनी दर्शन घेतले. बार्शीटाकळी तालुक्यात तसेच शहरात शिव भक्त श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी कावड यात्रा काढतात. या कावड यात्रेत खोलेश्वर महादेव मंदिर, रामेश्वर महादेव मंदिर माळीपुरा, जोगेश्वर महादेव मंदिर काळा मारुती



चौक बार्शीटाकळी कपिलेश्वर महादेव मंदिर पिंजर, मोरेश्वर महादेव मंदिर शिंदखेड, जोगेश्वर महादेव मंदिर आळंदी उस्मानाबाद, ऋषिकेश महादेव मंदिर पिंपळखुटा सिद्धेश्वर महादेव मंदिर कोथळी, विचेश्वर महादेव मंदिर कानिल आदी गावातील पालख्या येतात.

# प्रा. श्रेयस लोखंडे पीएच. डी. पदवीने सन्मानित

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**अकोला :** येथील रहिवासी प्रा. श्रेयस वसंत लोखंडे यांनी प्रथम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये ९०% गुण मिळवून एम.टेक.ची पदवी प्राप्त केली होती. पीएच.डी.साठी शासकीय शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्न वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट मुंबई येथून संशोधनाला सुरुवात केली. १४ ऑगस्ट २०२६ रोजी आय.आय.टी. मुंबई आणि इंदूर येथील तज्ज्ञ परीक्षकांनी



त्यांना पीएच.डी. पदवीसाठी पात्र घोषित केले.

त्यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय एक्सपरिमेंटल अँड न्यूमेरिकल इन्व्हेस्टिगेशन ऑफ शॉक वेव प्रपोगेशन ॲट स्मॉल स्केल हा आहे. आतापर्यंत त्यांचे दोन संशोधन प्रबंध जागतिक स्तरावरील नामांकित जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत. सध्या ते रिझवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मुंबई येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आपल्या यशाचे श्रेय ते मार्गदर्शक डॉ. अरविंद देशपांडे (डीन, व्ही.जे.टी.आय. मुंबई) यांना देतात. तसेच वडील प्रा. वसंत लोखंडे, आई प्रा. डॉ. मंगला लोखंडे, मोठे बंधू पारस लोखंडे, वहिनी प्रा. डॉ. स्वप्ना लोखंडे आणि पत्नी सौ. नेहा लोखंडे यांना देतात. त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

### रेल्वे स्थानकांवरील 5 खानपान स्टॉल 7 दिवस बंद

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**अकोला :** रेल्वे प्रवाशांकडून 'रेल मदद'वर खानपान स्टॉलमधून जादा दर आकारणीच्या वारंवार प्राप्त होणाऱ्या तक्रारींची भुसावळ विभागाने गंभीर दखल घेतली आहे. अकोल्यासह भुसावळ, जळगाव आणि मनमाड स्थानकांवरील एकूण पाच खानपान स्टॉल १८ ते २४ ऑगस्टदरम्यान सात दिवसांसाठी तात्पुरते बंद करण्यात आले आहेत.

यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. इतके दिवस स्टॉल सहसा बंद राहत नाहीत.

# न्याय मिळाला! लाड पागे प्रकरणातील 5 सफाई कर्मचाऱ्यांना अखेर नियुक्ती आदेश

वि. प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**अकोट :** अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या लाड पागे प्रकरणाला अखेर न्याय मिळाला असून, अकोट नगर परिषदेमार्फत पाच सफाई कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेल्या या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीमुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या नियुक्ती प्रक्रियेसाठी नगराध्यक्षा सौ. मायाताई विवेकराव धुळे, आरोग्य सभापती अभिजीत कराळे तसेच नगरसेवक



मंगेशभाऊ लोणकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर, उपमुख्याधिकारी धनंजय दहाडे, कार्यालय अधीक्षक प्रिया दामधर आणि आस्थापना विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नवनियुक्त सफाई कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्षा सौ. मायाताई विवेकराव धुळे, उपाध्यक्ष प्रथमेश संजय बोरोडे, आरोग्य सभापती अभिजीत कराळे, मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर, उपमुख्याधिकारी धनंजय दहाडे, कार्यालय अधीक्षक प्रिया दामधर तसेच आस्थापना विभागातील कर्मचारी यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा सकारात्मक निकाल लागल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

नियुक्ती मिळालेले कर्मचारी अनिल जगजीवन मोगरे, शेख अस्लम शेख अजिज, जावेद अहमद शेख रफिक, शेख अकिब शेख कासम, शेख मजीद शेख साबीर.

# हिंगणा (निंबा ) जिल्हा परिषद शाळेतील प्रकार; पालक आक्रमक

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**हातरुण :** निंबा अंदुरा सर्कल अंतर्गत हिंगणा (निंबा ) येथील पालकांनी सामूहिक शाळा सोडण्याचे दाखले आम्हाला देण्यात यावे यासाठी 17 ऑगस्ट 2026 ला मुख्याध्यापकांकडे अर्ज केलेला आहे.

य शाळा शिक्षण समिती व पालक वर्गानी गटशिक्षणाधिकारी बाळापूर तसेच मुख्य कार्यपालन अधिकारी अकोला यांच्याकडे वारंवार निवेदन देऊन सुद्धा येथे शिक्षक उपलब्ध केला नाही कारण शाळा सुरू झाली त्यावेळेस पासून



ते आज पर्यंत इथे एकच शिक्षक कार्यरत आहे त्यामुळे आमच्या पाल्यांचे शिक्षणाचे नुकसान होत आहे ही बाब आम्ही आपणाला निदर्शनास आणून देत आहोत तरी आम्हाला संबंधित अधिकारी व शिक्षण विभागाने त्वरित शिक्षक न दिल्यास आम्ही आमच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी पुढील शिक्षणासाठी शेजारच्या गावातील शाळेत त्यांना दाखल करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यामुळे खाली नमूद केलेल्या विद्यार्थ्यांची आपल्या शाळेतील नावे कमी करून त्यांना आवश्यक ते शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र दाखला देण्यात यावे ही विनंती मुख्याध्यापका जवळ केलेली आहे अमरदीप मनोहर तायडे, अनिल सुभाष तायडे, देवानंद मधुकर तायडे, स्वप्निल पद्माकर तायडे यांचे प्रत्येकी दोन विद्यार्थी शिवाजी विशंभर तायडे जितेंद्र महादेव तायडे सुशील तेजराव तायडे प्रवीण अरुण तायडे बाळकृष्ण काशीराम तायडे प्रमोद जगदेव तायडे विनायक चांगदेव तायडे उमेश नारायण तायडे मंगेश कैलास तायडे संतोष किसन तायडे देवेंद्र देविदास तायडे अक्षय काशीराम तायडे प्रशांत अरुण तायडे या सर्वांचे जवळपास 24 विद्यार्थी पहिली ते पाचवी पर्यंत या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण घेत आहेत तरी पालक वर्ग चांगल्या प्रकारे आक्रमक झालेला दिसत आहे.

### हिवरखेड बसस्थानकावर विना तिकीट प्रवाशावर कारवाई



प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**हिवरखेड :** बसस्थानकावर जळगांव जामोद ते अमरावती बसची मार्ग तपासणी पथकाने तपासणी केली असता यामध्ये एक प्रवासी वीना तिकीट आढळून आला. या प्रवाशांविरुद्ध मार्ग तपासणी पथकाने कारवाई करून विना तिकीट काढून बसमध्ये प्रवास करू नका विना तिकिटचे जो कोणी प्रवाशी आढळेल त्याच्या विरुद्ध अशीच कारवाई केली जाईल.

### एसआयआरमधील उत्कृष्ट कार्याबद्दल शिक्षक सूरज तिवारी यांचा सन्मान



प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**मूर्तीजापूर :** शहरात सुरू असलेल्या एसआयआरच्या प्रक्रियेला प्रशासनाची शिस्त आणि नागरिकांचे सहकार्य यांची सांगड घालून गतिमान करण्यासाठी विविध स्तरांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. या प्रक्रियेत नागरिकांशी समन्वय साधत, सोपविलेली जबाबदारी अत्यंत तत्परतेने आणि जबाबदारीने पार पाडणारे जे. बी. हिंदी विद्यालयातील शिक्षक तथा बीएलओ सूरज तिवारी यांच्या उल्लेखनीय कार्याची प्रशासनाने दखल घेत त्यांचा गौरव केला. एसआयआर प्रक्रियेदरम्यान नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून त्यांनी केलेल्या कार्यामुळे संबंधित कामकाजाला गती मिळण्यास मदत झाली. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि प्रशासनाच्या प्रक्रियेबाबत आवश्यक माहिती देणे, यामध्ये त्यांनी विशेष योगदान दिले.

### श्री सत्यसाई प्रेम प्रवाहिनीचे उद्या आगमन



प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** प्रेम, भक्ती, सेवा आणि मानवतेचा शाश्वत संदेश जनमानसापर्यंत पोहोचविणाऱ्या श्री सत्यसाई प्रेम प्रवाहिनी रथयात्रेचे गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी मूर्तिजापूर शहरात आगमन होणार आहे. या पवित्र रथयात्रेच्या स्वागतासाठी साईभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शहरासह तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आलें आहे. अकोला जिल्ह्यातून अमरावती जिल्ह्याकडे मार्गस्थ होणारी गुरुवारी मूर्तिजापूर शहरात दाखल होणार आहे.

### डासांच्या वाढत्या प्रादुर्भावावर फवारणी सुरु

**शिक्षण सभापती सरिता पाटील यांच्या मागणीला यश**



प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**मूर्तीजापूर :** शहरात पावसाळ्यामुळे डासांचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी शिक्षण सभापती सौ. सरिता राहुल पाटील यांनी नगर परिषदेकडे केली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत शहरातील विविध भागांत डास प्रतिबंधक फवारणी सुरू करण्यात आली आहे. शहरात काही दिवसांपासून पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचत असून, त्यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. परिणामी नागरिकांमध्ये डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता निर्माण झाली होती. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक असल्याने तातडीने फवारणी करण्याची मागणी करण्यात आली होती.या संदर्भात शिक्षण सभापती सौ. सरिता राहुल पाटील यांनी मूर्तिजापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष हर्षलभाऊ साबळे तसेच मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करून शहरात डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करण्याची मागणी केली होती. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियमित फवारणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनातून निदर्शनास आणून दिले होते.

या मागणीची दखल घेत नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी शहरात डास प्रतिबंधक फवारणी करण्यास मंजुरी दिली. त्यानंतर नगर परिषद प्रशासनाच्या वतीने शहरातील विविध परिसरात फवारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

# श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशनच्या सहकार्याने राष्ट्रीय साहित्य पुरस्कार सोहळा संपन्न

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

**अकोला :** माहेश्वरी समाज ट्रस्ट, अकोला यांच्या वतीने श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित 'श्रीमती बसंती चांडक साहित्य पुरस्कार २०२६' वितरण सोहळा माहेश्वरी भवन, न्यू राधाकिसन प्लॉट, अकोला येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या साहित्यिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

गद्य लेखनासाठी डॉ. मदनगोपाल लढ्ढा, पद्य लेखनासाठी डॉ. स्वाती मानधना यांचा गौरव गद्य लेखन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल बीकानेर येथील डॉ. मदनगोपाल लढ्ढा यांना प्रथम पुरस्कार म्हणून एक लाख रुपये प्रदान करण्यात आले. तर पद्य लेखनासाठी बालोतरा (जोधपूर) येथील डॉ. सौ. स्वाती मानधना यांना २५ हजार रुपयांचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. दोन्ही



**स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण; समाजातील गुणवंतांचा सन्मान**

स्वातंत्र्य दिनानिमित्त माहेश्वरी भवन येथे ध्वजारोहण कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. सुनीलजी माणिकलालजी इन्नाणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विविध संस्थांमध्ये महत्त्वाच्या पदांवर निवड झालेल्या तसेच विशेष कामगिरी करणाऱ्या माहेश्वरी समाजातील गुणवंत व्यक्तींचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय तोष्णीवाल, विनीत बियाणी, सुनील माणिकलाल इन्नाणी, सौ. किरण मुंदडा, रमन हेड्डा, ब्रिजमोहन चितलांगे, महेश मुंदडा, रमाकांत खेतान, श्रीकिसन अग्रवाल, महेश राठी यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन शारदा बियाणी यांनी केले, तर विनीत बियाणी यांनी आभार मानले.

साहित्यिकांना पुरस्काराचे धनादेश व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी व्यवस्थापन बसंती हॉस्पिटलचे व्यवस्थापक विजय मुंदडा यांच्या मार्गदर्शन व सक्रिय सहभागातून करण्यात आले.

**साहित्यिक प्रतिभांना प्रोत्साहन देणारा उपक्रम**

साहित्यिक प्रतिभांना प्रोत्साहन व सन्मान देण्याच्या या उपक्रमात श्रीमती बसंती चांडक रिलीफ फाउंडेशनची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. फाउंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त श्यामसुंदरजी चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. साहित्याच्या माध्यमातून समाजाला दिशा देणाऱ्या प्रतिभांचा सन्मान करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थित समाजबांधवांनी कौतुक केले. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून नागपूर येथील सौ. किरणजी मुंदडा उपस्थित होत्या. माहेश्वरी महासभेच्या मुखपत्रिका 'माहेश्वरी'च्या संपादकांचीही यावेळी विशेष उपस्थिती होती.

## निधन वार्ता

**सखुबाई गवई**

**अडगांव बु. :** श्रीमती सखुबाई सोनाजी गवई, ८६ यांचे निधन झाले. त्यांच्या अचानक निधनामुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या पाठीमागे सहा मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.



...........

**अक्षय मोरे**

**अकोला :** अक्षय प्रभू मोरे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मोरे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते. त्यांच्या पश्चात आई,वडील व दोन लहान भाऊ आणि आप्त परिवार आहे.



# मराठी ही सक्तीची नव्हे, तर भक्तीची भाषा : एकनाथ शिंदे

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

## सव्वा लाख अमराठी भाषिकांनी शिकली मराठी भाषा!



**ठाणे:** मराठी ही सक्तीची नव्हे तर भक्तीची भाषा असून, अमराठी बांधवांनी स्वेच्छेने मराठी स्वीकारणे ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेची ताकद असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. महाराष्ट्र शासनाचा परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा पाठ्यक्रम अभियान' सांगता समारंभात ते बोलत होते.

शिंदे म्हणाले की, हा समारोप नसून मराठी अभिमानाची धडाकेबाज सुरुवात आहे. 'महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवादभाषा' हा महाराष्ट्राचा जयघोष असून, मराठीची भक्ती महाराष्ट्राला जोडणारी शक्ती आहे. १०५ दिवस चाललेल्या अभियानातून १.२५ लाख रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठी शिकून परीक्षा उत्तीर्ण केली. या सर्वांना प्रमाणपत्रे देण्यात आली. 'लाभले आम्हास सौभाग्य बोलतो मराठी' या ओळी उद्धृत करत त्यांनी मराठी ही अस्मिता, स्वाभिमान आणि मायबोली असल्याचे सांगितले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कायद्याचा बडगा न दाखवता प्रेमाने भाषा शिकविण्याचा मार्ग स्वीकारल्याचे कौतुक करत, कायद्याने नाही, प्रेमाने भाषा शिकते, असे शिंदे म्हणाले. मराठी शिकणाऱ्यांची टिंगल न करता त्यांच्याशी मराठीत संवाद साधण्याचे आवाहनही त्यांनी केले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मराठी स्वाभिमानाच्या विचारांचा उल्लेख करत त्यांनी मुख्यमंत्री म्हणून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा, लाडकी बहीण योजना, मुलींसाठी उच्च शिक्षण, महिलांना एसटीत ५० टक्के सवलत, लेक लाडकी आणि आईचे नाव अधिकृत नोंदीत देण्याचे निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी स्थापन झालेल्या धर्मवीर आनंद दिघे महामंडळाचा ५० कोटींचा निधी भविष्यात १,००० कोटींवर नेण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र उद्योग, स्टार्टअप, जीडीपी आणि परदेशी गुंतवणुकीत अव्वल असून दावोसमध्ये ३ व ४ लाख कोटींचे सामंजस्य करार झाल्याचेही त्यांनी सांगितले. सार्वजनिक कार्यक्रमांत संसदेने मान्यता दिलेले अधिकृत वंदे मातरम् गायले जावे, अशी सूचना करत 'मायबोलीची भक्ती, मराठीचा सन्मान हीच महाराष्ट्राची खरी शक्ती' असल्याचा संदेश त्यांनी दिला. या प्रसंगी उद्योग मंत्री उदय सामंत, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, मराठी भाषा सचिव किरण कुलकर्णी, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अप्पर परिवहन आयुक्त रवी गायकवाड, अभियान समन्वयक सल्लागार डॉक्टर ज्योती ठाकरे यांच्यासह अन्य पदाधिकारी अधिकारी रिक्षा टॅक्सी चालक बंधू-भगिनी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'पादचारी प्रथम' अभियानाचा आढावा, पादचाऱ्यांसाठी सुविधा वाढवणार

प्रतिनिधी १९ ऑगस्ट



**मुंबई:** 'पादचारी प्रथम'अभियानाच्या अनुषंगाने पादचाऱ्यांसाठी रस्ते व पदपथ अधिक सुरक्षित, सुलभ आणि अडथळामुक्त करण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी प्रभादेवी रेल्वे स्थानक, प्रस्तावित पादचारी पूल (FOB) तसेच परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. तसेच बाळाशेट मदुरकर मार्गावरील प्रभादेवी रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वार व निर्गमन मार्गाची श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांची पाहणी केली. प्रभादेवी रेल्वे स्थानक परिसरातील पादचारी पूल, प्रवेश-निर्गमन मार्ग, वाहतूक व्यवस्था आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. विद्यमान पादचारी पुलाच्या प्रस्तावित जिन्याच्या कामाला गती देण्यात यावी.

त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'Pay & Use' तत्वावरील प्रसाधनगृहांसाठी जागा उपलब्ध करून दिल्याने पश्चिम रेल्वेने प्रस्तावित जिन्याचे काम तातडीने पुढे नेण्याबाबत कार्यवाही करण्याची सूचना त्यांनी पाहणीप्रसंगी दिले. पादचारी पुलाच्या दक्षिणेकडील प्रवेश-निर्गमन मार्गाचे रुंदीकरण करताना तेथील अन्य प्रसाधनगृह हटविण्याची आवश्यकता असल्यास, पर्यायी प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. पश्चिम रेल्वेकडून प्रस्तावित पादचारी पुलाच्या सरेखनाबाबत व्यवहार्यता तपासून निर्णय घेण्यात यावा तसेच पुलाच्या उतरंड यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेशी समन्वय साधण्याची निर्देश त्यांनी दिले. रेल्वे परिसर व स्थानक परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे प्राधान्याने हटविण्यात यावीत, जेणेकरून प्रवाशांना व नागरिकांना स्थानकातून बाहेर पडताना तसेच परिसरात ये-जा करताना अडथळा निर्माण होणार नाही, अशा सूचना दिल्या. गर्दी कमी करण्यासाठी शेअर टॅक्सी थांबा तसेच टॅक्सी प्रवासी उतरण्याच्या ठिकाणांचे योग्य नियोजन करून त्यांचे आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्याबाबतचे निर्देशही श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी दिले. प्रभादेवी रेल्वे स्थानक व परिसराची सर्वंकष स्वच्छता करण्यासोबतच आवश्यक त्या ठिकाणी संपर्क व पोहोच रस्त्यांचे पुनर्पृष्ठीकरण करण्यात यावे.

# महापौरांच्या सोशल मीडियासाठी स्वतंत्र खर्च नाही

## महापौर कार्यालयाचा खुलासा

प्रतिनिधी १९ ऑगस्ट



**मुंबई:** मुंबईच्या महापौरांसाठी प्रसिद्धीकरिता २५ लाख रुपये खर्च केले जाणार असल्याच्या बातम्या विविध प्रसारमाध्यमातून प्रसारित होत आहेत. यासंदर्भात पुढील प्रमाणे वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगर पालिकेची विविध समाज माध्यमे (सोशल मीडिया) कार्यान्वित आहेत. ही समाज माध्यमे हाताळण्यासाठी तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता असते. महानगरपालिकेची 'रू4क्चरूष्ट' ही समाज माध्यमे हाताळणीसाठी 'मेसर्स रनटाईम सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड' या संस्थेची दोन वर्षांपूर्वी विहित निविदा प्रक्रिया राबवून नियुक्ती करण्यात आली आहे. ही संस्था तांत्रिक मनुष्यबळाचा पुरवठा करते. महानगरपालिकेची संपूर्ण समाज माध्यमे हाताळण्यासाठी या संस्थेला ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये यापूर्वीच मंजूर झाला आहे. याच नियुक्त संस्थेमार्फत, महापौर कार्यालय समाज माध्यमे हाताळण्यासाठी तांत्रिक मनुष्यबळाचा पुरवठा केला जातो आणि समाजमाध्यम हाताळले जाते. महापौरांनी यासाठी स्वतंत्र संस्था नियुक्तीची अथवा प्रसिद्धी कार्यांची सूचना केलेली नाही. त्यामुळे कृपया वस्तुस्थितीचा विपर्यास करू नये.

# राज्यासह देशात दुष्काळाचा धोका वाढला!

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

## स्कायमेटने वर्तवला अंदाज, महाराष्ट्रामध्ये पाच टक्के पावसाची तूट



**मुंबई** : जून-जुलैमधील पावसाची तूट ऑगस्टमध्ये भरून काढण्यात मान्सूनला अपेक्षित यश न आल्याने यंदाच्या संपूर्ण मान्सून हंगामात पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत देशभरात दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ८५ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे 'स्कायमेट'ने अद्ययावत अंदाजात म्हटले आहे. त्यामुळे दुष्काळाचा धोका वाढला असून, संपूर्ण हंगामात दुष्काळाची शक्यता ७० टक्के असल्याचे 'स्कायमेट'ने नमूद केले.

भारतीय हवामान विभागाने जुलैअखेरीस जारी केलेल्या अंदाजानुसार देशभरात ९४ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडेल असे म्हटले होते. 'स्कायमेट'च्या अंदाजानुसार, ऑगस्टमध्ये देशभरात सुमारे २१४ मिमी पाऊस पडण्याची शक्यता असून, हा पाऊस पावसाच्या दीर्घकालीन सरासरीच्या ८४ टक्के असेल. ऑगस्टमध्ये पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता ७० टक्के आहे. सप्टेंबरमध्येही स्थिती फारशी बदलण्याची शक्यता नसून, सुमारे १३४ मिलीमीटर म्हणजे दीर्घकालीन सरासरीच्या ८० टक्के पावसाचा अंदाज आहे. सप्टेंबरमध्येही सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता ७० टक्के आहे.

**सप्टेंबरच्या सुरुवातीला 'एल निनो' अधिक सशक्त!**

यंदाच्या मान्सूनवर वाढता 'एल निनो' परिणाम करू शकते, याकडे सातत्याने लक्ष वेधले जात होते. मात्र, काही भागांमध्ये विविध प्रणालींमुळे सरासरी किंवा अधिक पाऊस पडल्याने 'एल निनो'च्या परिणामाचा व्यापक अंदाज स्थानिकांना येत नसल्याचेही दिसले. विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील समुद्र आणि वातावरणातील परिणामांची साखळी अधिक मजबूत होत असून, सप्टेंबरच्या सुरुवातीला 'एल निनो' अधिक सशक्त होण्याची शक्यता आहे.

# महा वॉकेथॉन 2026'मध्ये अभिनेते संजय दत्त यांचा सहभाग

प्रतिनिधी १९ ऑगस्ट

## जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्यासाठी राज्यव्यापी उपक्रम



मुंबई: माती आणि जलसंधारणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर' या राज्यव्यापी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी प्रसिद्ध अभिनेते संजय दत्त यांना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी निमंत्रित केले असून, त्यांनी 'महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर' मध्ये सहभागी होणार आहे. जलसंधारणाचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि या उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त करून देणे हा या वॉकेथॉनचा प्रमुख उद्देश आहे. 'महा वॉकेथॉन २०२६' मध्ये लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी, कलाकार, खेळाडू, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्य नागरिकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**प्रत्येक जिल्ह्यात ३ किलोमीटरपर्यंत वॉकेथॉन**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कमाल ३ किलोमीटर अंतराची वॉकेथॉन आयोजित करण्यात आली आहे. वॉकेथॉन पूर्ण झाल्यानंतर सहभागी नागरिकांकडून मृद व जलसंधारणाची शपथ घेतली जाणार आहे. उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना ई-प्रमाणपत्र देण्यात येणार असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात येणार आहे.

**विजेत्यांसाठी ७१ हजार रुपयांची पारितोषिके**

वॉकेथॉनला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरावर प्रथम दहा विजेत्यांचा गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे. याशिवाय प्रायोजकांच्या माध्यमातून एकूण ७१ हजार रुपयांची रोख पारितोषिके देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रथम क्रमांक: २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक: १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक: १० हजार रुपये, सोडतीद्वारे सात सहभागी: प्रत्येकी ३ हजार रुपये. अशा पद्धतीने सहभागी नागरिकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

# समृद्ध भविष्यासाठी महाराष्ट्रच गुंतवणूकदारांचे यशस्वी डेस्टिनेशन: देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी १९ ऑगस्ट



**मुंबई:** गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी भारत आणि जगाला जोडणारे महत्त्वाचे प्रवेशद्वार म्हणून महाराष्ट्राची भूमिका अधिक बळकट होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व विकास, डेटा सेंटर, ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर आणि आधुनिक पायाभूत सुविधांची परिसंस्था राज्यात विकसित केली जात आहे. त्यामुळे समृद्ध भविष्य आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांचे यशस्वी डेस्टिनेशन ठरत आहे, असे सीएम देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने हॉटेल ललित येथे आयोजित राष्ट्रीय परिषद २०२६ मध्ये मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. अमेरिकेतील गुंतवणूकदारांनी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमधील उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा. आपल्या कल्पना, संशोधन आणि तंत्रज्ञान घेऊन महाराष्ट्रात यावे. राज्य शासनाच्या माध्यमातून त्यांना कौशल्यसंपदा, मोठी बाजारपेठ आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यामुळे अमेरिकन गुंतवणूकदारांनी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. सीएम फडणवीस म्हणाले की, भारत आणि अमेरिका यांच्यातील भागीदारी ही २१ व्या शतकातील अत्यंत महत्त्वपूर्ण भागीदारीपैकी एक आहे. या भागीदारीचा पुढील टप्पा धोरणात्मक संबंधांसोबतच आर्थिक सहभाग अधिक व्यापक आणि मजबूत करण्याचा आहे. या पुढील टप्प्यात महाराष्ट्र केंद्रस्थानी राहणार असून, सध्याचे दशक हे भारत-अमेरिका धोरणात्मक भागीदारीचे दशक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सने राष्ट्रीय परिषदेसाठी 'भारत-अमेरिका सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीची पुनर्रचना' हा विषय निवडला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात गुंतवणूक, संशोधन, उत्पादन तसेच विकासाच्या क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलरची**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सध्या ६६० अब्ज डॉलरची असून मागील सात वर्षांपासून राज्य सुमारे १०.२ टक्के विकासदराने प्रगती करत आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६५ टक्के लोकसंख्या २७ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील आहे. त्यामुळे महाराष्ट्राकडे मोठी तरुण आणि कुशल मनुष्यबळाची ताकद आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या तुलनेत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था जगातील पहिल्या २० देशांमधील अर्थव्यवस्थांच्या पातळीवर असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे आणि या तरुण भारतामध्ये महाराष्ट्र हे तरुणाईचे आकर्षण असलेले राज्य आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वैविध्यपूर्ण असून उत्पादन क्षेत्रापासून मनोरंजन क्षेत्रापर्यंत विविध उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाचा सहभाग आहे.

**AI, डेटा सेंटर आणि GCC क्षेत्रात मोठ्या संधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान भारत-अमेरिका भागीदारीला नवे स्वरूप देत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. अमेरिकेकडे नवीन संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि जागतिक उद्योगांच्या विकासामध्ये आघाडी घेण्याची क्षमता आहे. महाराष्ट्राकडे मोठी बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा असल्याने महाराष्ट्र आणि अमेरिका मिळून ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर, नवीन डेटा सेंटर आणि तंत्रज्ञानाधारित परिसंस्था विकसित करू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासोबतच जागतिक पुरवठा साखळी अधिक मजबूत करण्यावरही दोन्ही देशांनी भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय आणि आरोग्य क्षेत्रातील भारताची जागतिक क्षमता अधिक मजबूत होत असून त्यामध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. "आरोग्य क्षेत्रामध्ये भारत हे स्केल इंजिन, तर अमेरिका इनोव्हेशन इंजिन आहे. भारताची मोठी आरोग्यसेवा क्षमता आणि अमेरिकेचे संशोधन व नवोन्मेष यांची सांगड घातल्यास महाराष्ट्राच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात मोठी झेप घेता येऊ शकते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची घोषणा: मराठी Gen Z साठी सरकार सहभागी होणार

राजेश जायस्वाल १९ ऑगस्ट



**मुंबई:** मराठी चित्रपटसृष्टीतील नव्या पिढीचा, विशेषतः जेन झी प्रेक्षकांचा वेध घेणाऱ्या आणि आधुनिक तंत्रज्ञान, व्हिज्युअल इफेक्ट्स तसेच अत्याधुनिक तांत्रिक माध्यमांचा प्रभावी वापर करणाऱ्या विशेष चित्रपटाच्या निर्मितीत महाराष्ट्र शासन सहभागी होणार आहे, अशी महत्त्वपूर्ण घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिसंवादात ते बोलत होते. मराठी चित्रपटांमध्ये दर्जेदार आशय, गुणवत्ता, नावीन्य आणि उत्तम अभिनयाची कोणतीही कमतरता नाही. मात्र, चित्रपटांना व्यावसायिक यश मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेल्या 'कनेक्टिंग लिंक'वर काम करण्याची गरज आहे, असे ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.

मराठी चित्रपटसृष्टीने दर्जेदार आशय आणि नाविन्यपूर्ण मांडणीची परंपरा जपली आहे. मात्र, केवळ उत्तम चित्रपटाची निर्मिती करून चालणार नाही, तर त्यासाठी उपलब्ध स्क्रीनची संख्या, वितरण व्यवस्था आणि प्रेक्षकवर्ग यांचाही सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून व्यवहार्य आणि परिणामकारक मॉडेल तयार झाल्यास महाराष्ट्र शासन त्यामध्ये गुंतवणूकदार म्हणून भूमिका घेण्यास तयार आहे, असे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

**नव्या पिढीशी भावनिक नाते निर्माण करण्याची गरज**

दक्षिण भारतीय चित्रपटांना त्यांच्या प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या भावनिक प्रतिसादाचा दाखला देत मराठी चित्रपटांसाठीही नव्या पिढीशी भावनिक नाते निर्माण करणारा प्रेक्षकवर्ग विकसित करण्याची गरज, मराठी जेन झी प्रेक्षकांनी अन्य भाषिक मनोरंजनाकडे वळण्याऐवजी मराठी चित्रपटांकडे आकर्षित व्हावे, यासाठी त्यांच्या आवडी-निवडी आणि मनोरंजनाच्या बदलत्या पद्धतींचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**AI आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे आव्हान संधीत बदलण्याचे आवाहन**

कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे चित्रपटसृष्टीसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत.

मात्र, या आव्हानांचे संधीत रूपांतर करणे आवश्यक आहे, कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञानाची उपयुक्तता, त्यातील संधी आणि संभाव्य आव्हाने यावर प्रात्यक्षिकांसह चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित करण्याची सूचनाही त्यांनी केली.

**विशेष चित्रपटासाठी शासनाची आर्थिक भूमिका**

जेन झी प्रेक्षकांना लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञान, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि प्रभावी निर्मितीमूल्यांचा वापर करणारा विशेष मराठी चित्रपट तयार करण्याची आवश्यकता आहे. अशा चित्रपटाच्या निर्मितीसाठी लागणारा आर्थिक भार केवळ निर्मात्यांवर पडू नये, यासाठी राज्य शासन या प्रकल्पात सहभागी होऊन भूमिका बजावेल, यामुळे मराठी चित्रपटसृष्टीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासोबतच नव्या प्रेक्षकवर्गाला आकर्षित करणाऱ्या आशयपूर्ण आणि भव्य निर्मितींना चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135